MMRC

## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो -3 मार्ग

## मेट्रो -3 च्या विद्युतीकरणाच्या करारावर स्वाक्षऱ्या

**मुंबई, 28 मार्च 2018** :- संपूर्णत: भुयारी असलेल्या मेट्रो -3 भुयारासह डेपोचे विद्युतीकरण करण्याच्या महत्त्वपूर्ण करारावर आज स्वाक्षऱ्या झाल्या. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) व अँलस्टोम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड व अँलस्टोम ट्रान्सपोर्ट एस.ए समूह यांच्या अधिकाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या ३३.५ किमी संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गाच्या  विद्युतीकरणाच्या कामाचे कंत्राट मुं.मे.रे.कॉने दिनांक 21 फेब्रुवारी, 2018 रोजी अँलस्टोम समूहाला दिले आहे. या कामात ३३.५ किमी संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गाच्या भुयारासह डेपोचे विद्युतीकरण, 25केव्ही व 33 केव्ही विद्युत वाहिन्या उभारण्याचे काम तसेच 27 स्थानकांवर ऑक्झलॅरी उपकेंद्र स्थापन करण्याच्या  विद्युतीकरणाच्या कामाचा समावेश आहे.

आज झालेल्या करारांमध्ये मुख्यत्वे उपरी विद्युत यंत्रणा व ऑक्झलॅरी उपकेंद्र च्या संरेखन (डिझाईन), स्थापना व कार्यान्वयनच्या कामाचा समावेश आहे. या कंत्राटावर मुं.मे.रे.कॉच्या वतीने संचालक (प्रणाली) श्री. ए.ए.भट्ट, तर अँलस्टोम समूहाच्या वतीने श्री. श्रीराम राजु व श्री. ब्रुनो इझामबर्ट यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

कराराविषयीआपली प्रतिक्रिया देताना व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या, मेट्रो-3 च्या अंमलबजावणीत विद्युतीकरण व संकर्षण (ट्रक्शन) कामाची भूमिका महत्त्वाची असते. मेट्रो-3साठी तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत अशी विद्युतीकरण व संकर्षण यंत्रणा राबविण्यासाठी  तसेच हे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.